दैनिक


# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१२ डिसेंबर २०२४


## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** मुंबईत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांविरोधात मुंबई पोलिसांनी विशेष मोहीम राबवली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई करण्यात आली. त्यात ४२६ रिक्षा पोलिसांना जप्त केल्या.वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांना जरब बसवण्यासाठी मुंबई पोलिसांनी २९ नोव्हेंबरपासून विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत विनापरवाना, विना गणवेश, विना बॅच, विना अनुज्ञप्ती रिक्षा चालविणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. तसेच, कार्यक्षमता प्रमाणपत्र नसणे, नियमापेक्षा अधिक प्रवाशांना रिक्षात बसविणे, वाहनतळाबाहेर रिक्षा उभे करणे, अवैधरित्या प्रवाशांना बोलाविणे, भाडे नाकारणे आदी एकूण २०९९ वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या कारवाईतून एकूण ४२६ रिक्षा जप्त करण्यात आल्या. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणारे रिक्षा चालक आढळल्यास पोलीस दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाकडे तक्रार दाखल करण्यासाठी १००, १०३, ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे करण्यात आले आहे.

## आता समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्याही बदल्या होणार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बुलडाणा :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी पदी नियुक्ती झाली की त्या कर्मचाऱ्याला एकाच ठिकाणी कायम 'अडकून' पडावे लागत होते! याचे कारण या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदलीचे प्रावधानच नव्हते मात्र आता त्यांच्या बदलीचा मार्ग सुकर झाला आहे. या संदर्भाततील शासन निर्णय १० डिसेंबर रोजी निर्गमित झाला आहे . या निर्णयाचे कर्मचाऱ्यांकाडून स्वागत करण्यात आले आहे. केंद्रीय आरोग्य, आयुष्, परिवार कल्याण राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत नव्हत्या. या अभियानांतर्गत नोकरीला लागल्यानंतर एकाच पदावर एकाच ठिकाणी कर्मचाऱ्यांना काम करावे लागत होते.

बुलडाणा जिल्हाच नव्हे तर राज्यातील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची ही अडचण ठरली.या विभागांतर्गत काम करत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या बदली संदर्भातील विनंती केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे केली होती. अधिकाऱ्यांच्या बदली विनंती संदर्भात आणि बदलीच्या मागणीसाठी पाठपुरावा करण्यात आला होता. या पाठपुराव्याला यश आले आहे.

### एक वेळ बदलीस मुभा!

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना संपूर्ण सेवा कालावधीत एक वेळ विशेष बाब म्हणून बदली करण्यास राज्य शासनाने मंजुरात दिली आहे. या संदर्भातील शासन निर्णय १० डिसेंबर २०२४ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने निर्गमित करण्यात आला आहे त्यामुळे आता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या बदलीचा मार्ग सुकर झाला आहे . यामुळे समुदाय आरोग्य अधिकारी प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी केंद्रीय आरोग्य राज्य मंत्र्यांचे आभार मानले आहे.

## स्कूलबस आणि दुचाकीची धडक, युवकाचा मृत्यू

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१०, ठाणे :** बुलडाणा-चिखली राज्य मार्गावर आज झालेल्या अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. बुलडाणा नजीकच्या येळगाव नजीक एका शैक्षणिक संस्थेची बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन ही दुर्घटना घडली. आज बुधवारी, ११ डिसेंबर रोजी झालेल्या या दुर्देवी अपघातात येळगाव जवळील आश्रम शाळेजवळ ही घटना घडली. अपघातात ठार झालेला तरुण हा बुलडाणा तालुक्यातील खूपगाव येथील रहिवासी असून जिवन इंगळे असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे.

बुलडाणा नजीकच्या सागवान येथील शिवसाई ज्ञानपीठ संस्थेची बस आणि म ोटरसायकलची समोरासमोर धडकून हा अपघात झाला. अपघात झाल्यावर घटनास्थळी नागरिकांनी धाव घेतली. अपघातात दुचाकीची मोडतोड होऊन युवक जागीच दगावला. काही जवाबदार नागरिकांनी घटनेची माहिती बुलडाणा शहर पोलिसांना दिली. शहर पोलिसांच्या पथकाने तात्काळ येळगाव गाठून घटनास्थळचा पंचनामा केला. वृत्त लिहिपर्यंत पोलीस कारवाई सुरू असल्याने पोलीस कारवाईचा तपशील मिळू शकला नाही.

### उपाय योजनांची गरज !

दरम्यान मलकापूर सोलापूर राज्य महामार्ग असल्याने या मार्गावर पहाटे ते रात्री उशिरापर्यंत मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. बुलडाणा शहराचा विस्तार आता येळगाव पर्यंत होत असून या मार्गावर मोठ्या शैक्षणिक संस्था, शाळा, महा विद्यालये आहेत. प्रवासी, वाहनांची संख्या आणि दुतर्फा वाहतुकीचे प्रमाण जास्त असल्याने रस्ता अपुरा पडत आहे. अनेक ठिकाणी प्रामुख्याने येळगाव परिसरात रस्त्यालगत असलेली अतिक्रम णे देखील वाहतुकीत मोठी अडचण ठरत आहे. वाहतुकीचा मुख्य मार्ग असल्याने या मार्गाने प्रवासी, माल वाहतूक मोठ्या संख्येने होत आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याने आणि वाहतूक विभागाने तातडीने उपाय योजना करणे आवश्यक ठरत आहे.

# परभणी बंदला हिंसक वळण; प्रकाश आंबेडकरांचा इशारा




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, परभणी :** परभणीत काही समाजकंटकांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ भारतीय संविधानाची तोडफोड केली. यानंतर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर आक्रमक झाले आहेत. त्यांनी हल्लेखोरांना अटक करा अन्यथा परिणाम भोगावे लागतील असा इशाराच दिला आहे.

### काय घडलं परभणीत?

परभणीत संविधानाच्या प्रतिची विटंबना करण्यात आल्याची घटना मंगळवारी घडली. त्यानंतर परभणीत आज बंदची हाक देण्यात आली. या दरम्यान बंदला हिंसक वळण लागलं आहे. आंदोलनकांनी काही दुकानांवर दगडफेक केली आणि पोलिसांच्या काही गाड्यांवरही दगड फेकले. ज्यानंतर पोलीस ॲक्शन मोडवर आले आहेत.

पोलिसांनीही या आंदोलकांवर सोम्य लाठीचार्ज केल्याचं पाहायला मि ळालं असून शहरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, परभणीतील या घटनेवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सरकारला इशारा दिला असून येत्या २४ तासांत सर्व हल्लेखोरांना अटक केली नाही तर त्याचे परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला आहे.

### काय म्हणाले प्रकाश आंबेडकर?

बाबासाहेबांच्या पुतळ्याची किंवा दलित अस्मितेच्या प्रतिकाची अशी तोडफोड किंवा विटंबना होण्याची ही पहिलीच घटना नाही. वंचित बहुजन आघाडीचे परभणी जिल्ह्यातील कार्यकर्ते प्रथम घटनास्थळी पोचले. त्यांनी केलेल्या निषेध आणि निदर्शनांमुळे पोलिसांनी एफआयआर दाखल करून घेतला असून एका समाजकंटकाला अटक केली आहे. तरीही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ नका. शांतता राखा, असे आवाहन ॲड. आंबेडकर यांनी आंबेडकरी समाजाला केले आहे. येत्या २४ तासांत प्रशासनाने सर्व हल्लेखोर समाजकंटकांना अटक केली नाही तर त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा प्रकाश आंबेडकर यांनी दिला.

### राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?

परभणी शहरात एका समाजकंटकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केल्याचा प्रकार संतापजनक आहे. हे कृत्य करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. संविधानाचा अवमान करणाऱ्यांना त्यातील समतेची तत्वे अमान्य आहेत असेच म्हणावे लागेल. या घृणास्पद कृत्याचा निषेध.

### परभणीत बंदला हिंसक वळण

परभणी शहरातील विसावा कॉर्नर परिसरामधील व्यापाऱ्यांनी बाहेर ठेवलेले पीव्हीसी पाईप पेटवून देण्यात आला असून या पाईपला मोठ्या प्रम णावर आग लागली आहे. पोलिसांच्या गाडीवरही दगडफेक करण्यात आलीय. काही गाड्यांची मोडतोडही आंदोलकांकडून करण्यात आली यानंतर आता पोलिसांनी ॲक्शन मोडवर आल्याचा दिसून येते पोलिसांनीही या आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज केल्याचं पाहायला मिळाले तसेच शहरांमध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसंच परभणी या ठिकाणी तणावपूर्ण शांतता पाहण्यास मिळते आहे. यावर विविध प्रतिक्रिया येत असतानाच प्रकाश आंबेडकर यांनीही इशारा दिला आहे.

# राज्यस्तरीय आंतरशालेय, महाविद्यालयीन ६ वा जाधवर विज्ञान महोत्सव




**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.११, खडकवासला (पुणे) :** प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य आणि विज्ञान म हाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, विज्ञान विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहयोगाने 'सहाव्या जाधवर सायन्स फेस्टिव्हल' या राज्यस्तरीय विज्ञान म होत्सवाचे आयोजन करण्यात आले. शनिवार, दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी नजहे येथील डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल - १ येथे महोत्सव होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाच्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे. म होत्सवामधील स्पर्धा शालेय (इयत्ता ८ वी ते १० वी), कनिष्ठ (इयत्ता ११ वी व १२ वी), वरिष्ठ महाविद्यालय (पदविका शिक्षण) आणि पदव्युत्तर व खुल्या अशा चार गटात होणार आहे.

सायन्स सोसायटी आणि टेक्नॉलॉजी या मुख्य संकल्पनेंतर्गत नॅशनल एनर्जी कन्झर्व्हेशन, प्युरिफिकेशन मेथड फॉर वॉटर एअर सॉईल, बॅटरी फ्रॉम वेस्ट, बायो फ्युएल फ्रॉम ॲग्रीकल्चर वेस्ट, स्मार्ट एआय बेस रोबोट, बायो मेडिकल वेस्ट प्युरिफिकेशन, स्मार्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट, टेक्नॉलॉजी इन व्हेईकल इंडस्ट्री अशा विविध संकल्पनांवर विद्यार्थी प्रकल्पाचे सादरीकरण करणार आहेत. विजेत्यांना एकूण १ लाख रुपयांची पारितोषिके व ट्रॉफी देण्यात येणार आहेत.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, 'जाधवर सायन्स फ ेस्टिव्हल' या राज्यस्तरीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांसाठी हा एक अभिनव व आदर्श उपक्रम असणार आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व्यासपीठ मिळणार आहे. विज्ञान विषयाची विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी, यासाठी विविध उपक्रम संस्थेतर्फे राबविण्यात येतात. स्पर्धेत सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे. नोंदणीची अंतिम तारीख २४ डिसेंबर असून गटाप्रमाणे अनुक्रमे ७७९८१०११२२, ९७६४७०७३७९, ७९७२४८३५७५, ९०६७९०९०७५ या क्रमांकावर संपर्क साधावा. तरी विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

संशोधन करणा-या विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांची शिष्यवृत्ती भारताबाहेरील इतर देशांमध्ये संशोधन करुन पेटंट मिळविण्याचे प्रमाण अधिक आहे. भारतामध्ये संशोधन व पेटंटचे प्रमाण कमी असून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटने अभिनव योजना सुरु केली आहे. इन्स्टिट्यूटमधील संशोधन करणा-या विद्यार्थ्याला विनातारण १० लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विषयाची गोडी निर्माण होत अधिकाधिक संशोधनास युवावर्ग प्रवृत्त होईल, असे ॲड. शार्दुल जाधवर यांनी सांगितले.

## पारनेर तालुक्यातील दुष्काळी गावांचा पाण्याचा प्रश्न पुन्हा पेटणार !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील दुष्काळी गावांच्या पाण्याच्या प्रश्नावर विधानसभेच्या निवडणुकांपूर्वी पारनेर तहसील कार्यालयावर संतोष वाडेकर, अशोक आंधळे, बाळशिराम पायमोडे यांनी आम रण उपोषण केले होते.

त्यावेळी मिळालेल्या आश्वासनावर पुढील दिशा ठरवण्यासाठी सुपा येथील शासकीय विश्रामगृहावर भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. आगामी काळात पाण्याचा लढा तीव्र करण्यासाठी सर्वानुमते काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

त्यामध्ये तालुकाभर संपर्क अभियान राबविणे, गाव तिथे कृती समिती स्थापन करून या चळवळीत मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना सामील होण्याचे आवाहन करून हजारो शेतकऱ्यांना एकत्र करून मार्च, एप्रिल महिन्यात जन आंदोलन करण्याचा सर्वानुमाते निर्णय घेण्यात आला.

यावेळी बाळशिराम पायमोडे, जिल्हा संघटक संतोष वाबळे, सुभाष पाटील करंजुले, अविनाश देशमुख, तालुकाध्यक्ष मनोज तामखडे, तालुका सचिव अन्सार पटेल, रघुनाथ मांडगे, अरुण बेलकर, प्रवीण खोडदे, अनिल सोबले, एडव्होकेट सचिन कोकाटे, डॉक्टर विलास काळे, सुभाष शिंदे, अंकुश कोल्हे, सचिन बारवकर, राहुल गुंड, आनंदा सोनवने, संदीप साबळे, संजय भोर, रामदास साठे, चेअरमन संजय भोर, वसंत साठे, नंदन भोर यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या निषेधार्थ किनवट मध्ये आंदोलन



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.११, किनवट (नांदेड) :** बांगलादेश देशातील अल्पसंख्याक असलेला हिंदू समाज हा संकटात सापडला आहे. बहुसंख्या कट्टर मुस्लिम पंथीयांनी हिंदूंचे धार्मिक, सामाजिक, आणि संता विरुद्ध उत्पीडनावर जोर दिलाय. मानव अधिकार्यांच्या चिंधड्या केल्या जात असल्याच्या निषेधार्थ आज दाहा डिसेंबर किनवटमध्ये बांगलादेश हिंदू न्याय यात्रा पार पडली. सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत थेट प्रधानमंत्री मोदींनी हस्तक्षेप करून बांगलादेशी हिंदू समाज,संत, मंदिरे धार्मिक स्थळ सुरक्षित ठेवण्याची मागणी करणारे शेकडो हिंदूंच्या स्वाक्षऱ्यांचे पत्र पाठवून बांगला देशाला इशारा दिला आहे. जागतिक मानव हक्क दिनाच्या औचितत्यावर दहा डिसेंबर रोजी किनवट नगरीतील छत्रपती शिवाजी महाराज नियोजित पुतळा प्रांगणापासून बांगलादेशी हिंदू न्याय यात्रा काढून सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार रामेश्वर मुंडे यांच्याकडे पत्र सोपवून यात्रेची सांगता करण्यात आली. इस्कॉनचे चिन्मय कृष्ण महाराजासह इतर धर्मआचार्यासह अनेकांना केलेल्या अटकेतून सुटका करण्यात यावी. जागतिक पटलावर प्रधानमंत्री आणि बांगलादेशी इंदूर केलेल्या मानव हक्क अधिकार उल्लंघनाचा मुद्दा मांडून बांगला कट्टर पणत्यांचा क्रुर चेहरा जगासमोर आणावा असे प्रधानमंत्र्यांना साकडे घातले आहे.




## वाढदिवस दक्षिणेतील देवाचा

दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७४ वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात तीन वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता. रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने दोन वर्षापूर्वी गौरविण्यात आले होते. ६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व. रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. रजनीकांत यांचे देश विदेशात हजारो फॅन क्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो. त्यांच्या चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात. १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असे असून आईचे नाव जिजाबाई असे आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी- कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते. रजनीकांत यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजम ावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला. अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले. केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या. चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंट साठीही ओळखले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकी बद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईल बद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैली साठी रजनीकांत ओळखले जातात. दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथेही त्यांचे फॅन क्लब्ज आहेत. सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे. रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत. ते त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत. उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये.

जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# हे हो काय? लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी

संयुक्त राष्ट्रांनी बालकल्याणार्थ स्थापन केलेले अभिकरण- एजन्सी होय. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने दि.११ डिसेंबर १९४६ रोजी त्याची स्थापना केली. त्याचे पूर्वीचे नाव युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रेन्स इमर्जन्सी फंड असून युनिसेफ या संक्षिप्त नावाने ही संस्था सर्वपरिचित आहे. यूरोपमध्ये दुसऱ्या महायुद्धाची झळ पोहोचलेल्या व तातडीच्या मदतीची गरज असलेल्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार आदी पुरवण्याचे कार्य युनिसेफने स्थापनेनंतर लगेचच तत्परतेने सुरू केले. त्यानंतर त्याने आपले सेवाक्षेत्र विस्तारले आणि सन १९५०नंतर विशेषत: कमी विकास झालेल्या देशांत आणि आपद्ग्रस्त भागांत लक्ष केंद्रित केले. बालकांमधील रोगराई, कुपोषण, निरक्षरता यांचे उच्चाटण करण्यासाठी काही दीर्घ पल्ल्याचे उपक्रम कार्यान्वित केले. पुढे सन १९५३मध्ये त्याच्या शीर्षकातील इंटरनॅशनल व इमर्जन्सी हे शब्द वगळले. विद्यमान काळातील युनिसेफचे कार्य म्हणजे अविकसित तसेच विकसनशील देशांतील कोट्यावधी बालकांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्या त्या देशांतील शासन राबवत असलेल्या कार्यक्रमांना सर्वतोपरी साहाय्य करणे व शंभराहून अधिक देशांतील बालकांचे अनारोग्य, उपासमार, निरक्षरता यांसारखे मूलभूत प्रश्न सोडवणे यासाठी मदत करते. बालकांसाठी रोगनियंत्रण कार्यक्रम, आरोग्य केंद्रे, दीन-सेवाकेंद्रे, शालेय आहार योजना, तसेच इतरही अनेक प्रकल्प व उपक्रम राबविण्यासाठी नानाविध प्रकारच्या सुविधा पुरवते. सुश्रूषा, अध्यापनादी सेवांचे प्रशिक्षण व्यक्तींना देण्यासाठी यामार्फत आर्थिक अनुदानही दिले जाते.

युनिसेफचे एक मुख्य कार्यालय न्यूयॉर्क शहरात आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक समितीमार्फत विविध देशांतील प्रतिनिधींचे कार्यकारी मंडळ तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवडले जाते. त्याच्या या कार्यकारी मंडळाच्या अखत्यारीत धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे व त्याच्या कार्यकमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे, ही कार्ये प्रामुख्याने येतात. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव कार्यकारी संचालकाची नियुक्ती करतात. त्याच्या न्यूयॉर्कच्या मुख्यालयातील १,४०० कर्मचारी तसेच जगभरातील सुमारे ४० क्षेत्रीय कार्यालये ही कार्यकारी संचालकांच्या नियंत्रणाखाली येतात. त्याचे शंभराहून अधिक देशांत जे उपक्रम चालतात, त्यांपैकी अनेक संयुक्त राष्ट्रांच्या इतर अभिकरणाच्या तसेच काही स्वयंसेवी संस्थांच्या सहयोगाने संयुक्त रीत्या चालतात. संयुक्त राष्ट्र संघाच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेमार्फत विविध देशांचे नागरिक असलेल्या ३६ कार्यकर्त्यांची निवडलेली समिती या संस्थेचा दैनंदिन व्यवहार व इतर कामकाज सांभाळते. याशिवाय योजना बनविणे, उपक्रमांना मान्यता देणे व आर्थिक नियोजन करणे, अशा जबाबदाऱ्या या समितीमार्फत पार पाडल्या जातात. युनिसेफ- दि युनायटेड नेशन्स चिल्ड्रंस फण्ड म्हणजे पूर्वीची दि युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रंस इमर्जन्सी फण्ड याची स्थापना झाली. ती संयुक्त राष्ट्रसंघामार्फत दुसरे विश्वयुद्ध संपल्यानंतर युद्धामध्ये होरपळलेल्या देशांमधील मातांना आणि मुलांना आवश्यक तो अन्नपुरवठा आणि वैद्यकीय मदत पुरवण्यासाठी दि.११ डिसेंबर १९४६ रोजी करण्यात आली. पोलिश फिजिशियन लुडविक रॅशमन यांच्याकडे या संस्थेचे



**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

संस्थापक म्हणून पाहिले जाते. तसेच या संस्थेचे प्रथम अध्यक्ष देखील हेच होते. हे एकमेव अध्यक्ष आहेत ज्यांनी दोन वर्षांपेक्षा या संस्थेचा अध्यक्ष म्हणून कारभार सांभाळला होता. सन १९५० साली या संस्थेच्या कार्याची कक्षा वाढवून विकसनशील देशांमधल्या लहान मुलं आणि स्त्रिया यांच्या दीर्घकालीन गरजा आणि समस्यांचे निदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९५३ साली ही संस्था संयुक्त राष्ट्रसंघाचा कायमचा भाग झाली आणि यातून इंटरनॅशनल व इमर्जन्सी हे दोन शब्द वगळण्यात आले. तरीदेखील याचे पूर्वीचे संक्षिप्त नाव युनिसेफ तसेच वापरात आहे. सरकारी आणि खाजगी देणगीदारांकडून मिळणाऱ्या देणग्यांमार्फत या संस्थेचा कारभार चालवला जातो. या संस्थेचं सन २०१५ सालचं उत्पन्न ५ अब्ज ९५ लक्ष ५७ हजार ४७१ डॉलर इतके होते. संस्थेच्या कारभारासाठी आवश्यक असलेल्या सर्व आवश्यक बाबींमध्ये विविध देशांमार्फत मिळून दोन तृतीयांश एवढा वाटा उचलल्या जातो. उर्वरित वाटा खाजगी संस्था आणि स्वेच्छेने काही लोकांनी वैयक्तिक रित्या उचललेला असतो. संस्थेच्या उत्पन्नाच्या ९२ टक्के वाटा हा या संस्थेमार्फत राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांवर खर्च केला जातो. यांचे उपक्रम- योजना लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि त्यांच्या आयुष्याच्या कल्याणासाठी चालना देणाऱ्या असतात. या संस्थेचं कार्य एकूण जगातील १९२ देशांमध्ये चालतं. दीडशेहून अधिक देशांमध्ये या संस्थेची कार्यालयं आहेत आणि चौतीस राष्ट्रीय समित्यांमार्फत विविध देशांमध्ये या संस्थेचे कामकाज यजमान देशासोबत मिळून तयार केल्या जाणाऱ्या उपक्रमांमार्फत चालवले जाते. संस्थेच्या विविध ठिकाणी असलेल्या सात मुख्य प्रादेशिक कार्यालयातून विविध देशात असलेल्या कार्यालयांना तांत्रिक मदत देण्यात येते. याच संस्थेचं दुसरे मुख्य कार्यालय डेन्मार्क देशाच्या राजधानी असलेल्या कोपनहेगन येथेही आहे. मुलांना आवश्यक असणाऱ्या लसी आणि प्रतिजैविक औषधांचा पुरवठा हा मुख्यत: या कार्यालयातून करण्यात येतो. याशिवाय एड्स पीडित, कुपोषित माता व बालकांना मदत करणे, आपत्तीसमयी राहण्याची सोय करणे किंवा निवाऱ्यासाठी ठिकाण उपलब्ध करून देणे, तात्पुरत्या छावण्या उभारणे, कुटुंबातील विखुरलेल्या- हरवलेल्या सदस्यांचे पुर्नमिलन घडवणे आणि शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करणे, आदी उपक्रम राबविले जातात. युनिसेफला स्वेच्छेने दिल्या जाणाऱ्या देणग्या, निधी यांद्वारे अर्थसाहाय्य होते. त्याच्या उत्पन्नाचा जवळजवळ तीन-चतुर्थांश हिस्सा वेगवेगळ्या देशांच्या शासनांकडून येतो. काही उत्पन्न निरनिराळ्या संघटना, व्यक्ती यांच्या देणग्यांतून मिळते, तसेच भेटकार्डांची विकी व इतर निधिसंकलन योजना यांतूनही काही उत्पन्न जमते. त्याच्या एकूण उत्पन्नापैकी एक-चतुर्थांश हिस्सा तातडीच्या आपत्कालीन सेवांसाठी राखून ठेवलेला असतो. नैसर्गिक आपत्ती, राजकीय अस्थैर्य, साथीचे रोग अशा कारणांमुळे नुकसान पोहोचलेल्या विपद्ग्रस्त बालकांसाठी त्याचा उपयोग केला जातो. दीर्घ पल्ल्याच्या पुनर्वसन योजनांसाठीही युनिसेफ साहाय्य देते. बालपणी उद्भवणाऱ्या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच एच‌आयव्ही- एड्स सारख्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, म्हणून उपयोजिलेल्या प्रतिरक्षक उपकमांना युनिसेफ सर्वतोपरी मदत करते. सन १९७६मध्ये त्याने जगातील अविकसित देशांतील बालके व माता यांच्या आरोग्य सुधारणेसाठी पोषक आहार, पर्यावरण-स्वच्छता, शिक्षण, समाजकल्याण इ.बाबींमध्ये मूलभूत सेवा सुविधांविषयक एक योजना तयार केली. बालहक्कांच्या जाहीरनाम्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्याच्यावर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सोपवली आहे. त्यानुसार मुलांच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी पोषक आहार आदी सुविधा व सवलती त्यांना प्राप्त करून द्याव्यात, असे निवेदन त्यात आहे. या जाहीरनाम्यान्वये बालकांचे हक्क जपण्यात आले आहेत. साहेब, आपल्याकडे अविकसित भागातील प्राथमिक शाळा कमी पटसंख्येच्या बनावाखाली बंद केल्या जात आहेत. युनिसेफ यात जातीने लक्ष घालेल का? मागास भागातील आमच्या या दळभद्री बालकांना न्याय मिळेल का? असे लोकातून प्रश्नचिन्ह उमटतात. बालकांच्या आंतरराष्ट्रीय वर्षातील संयुक्त राष्ट्रांच्या विविध उपकमांचा समन्वय साधणारी युनिसेफ ही मध्यवर्ती संघटना होय. सन १९६५मध्ये त्याला त्याच्या बालकल्याणाच्या कार्यार्थ, तसेच आंतरराष्ट्रीय बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या भूमिकेबद्दल शांततेसाठी असलेला नोबेल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. याशिवाय सन १९८९ साली इंदिरा गांधी शांतता पुरस्कार आणि सन २००६ साली प्रिन्स ऑफ अस्च्यूरियास अवॉर्ड ऑफ कॉंकॉर्ड ही पारितोषिकेही देण्यात आली आहेत.

**!! विश्वातील सर्व बालकांना युनिसेफ स्थापन दिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

### प्रांजळ...

निवडणूकीचीप्रक्रिया
हवीयं निर्मळ प्रांजळ
बॅलेट पेपर आवडता
पुन्हा करायचा जवळ

ईव्हीएम पेक्षा चांगली
मत पेटी प्रिय अरवळ
काट्यांने वेढली भली
मोहमई भासे हिरवळ

सिस्टीमले ठरवे दोषी
चला उठवायचे गदळ
डोळ्यांत घुसे कुस्पट
बेधुंद फैलावले वादळ

वाजत आणली वरात
कसे माया करे पातळ
मध्येचं करता दुस्वास
हेचं का प्रेम ते नितळ

व्याधी आपल्यामनात
उगाअकारण विव्हळ
जेंव्हाकेंव्हा हार मिळे
येणारं चक्कर भोवळ

दोषआपले लपवायला
नेत्यांची उठे अदावळ
सिस्टीम मध्येचं फॉल्ट
सर्वत्र उठवली वावटळ

बोलत बसले अद्वातद्वा
जिभा वळवळ टळटळ
कुणाच्या पारड्या काय
बाबांनो हार जय अटळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# "नमन दिनदर्शिका" सोहळ्याला रसिकांची हाऊसफुल्ल गर्दी !



**प्रमोद गांधी यांनी केले कौतुक !**

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.११, मुंबई :** श्री पाणबुडी देवी कलामंच मुंबई ह्या संस्थेचा दिनदर्शिका प्रकाशन सोहळा-२०२५,व ह्या मोसमातील नमन कार्यक्रमाचा शुभारंभ प्रयोग मा.दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले (मुंबई) येथे, मंगळवार दिनांक.१० डिसेंबर२०२४ रोजी, रात्रौ.०८:३० वा. रसिकांच्या हाऊसफुल्ल गर्दीत संपन्न झाला. मनोरंजनार्थ सदर कार्यक्रमात रत्नागिरी जिल्ह्यातील सुप्रसिद्ध श्री हनुमान भक्त सेवा मंडळ, मु.पो.फणसवळे यांचा नमन नाट्यप्रयोग आयोजित करण्यात आला होता.

त्याच बरोबर या कार्यक्रमावर FSKA वर्ल्ड कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत गुहागर तालुक्यातील भातगाव येथील कु.ध्रुव निलेश हुमणे यास सुवर्णपदक प्राप्त झाल्याप्रति विशेष आदर्श युवा पुरस्कार २०२४-२०२५ ने पुष्पगुच्छ, शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह गौरविण्यात आले. प्रमुख मान्यवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष तसेच उद्योजक प्रमोद गांधी, नमन लोककला संस्थेचे अध्यक्ष- रवींद्र मटकर यांच्या शुभहस्ते सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आयोजक श्री पाणबुडी देवी कलामंच सह दिपक कारकर यांच्यासारखी मंडळी मुबंई सारख्या रंगमंचावर कोकणातील लोककलांचे आयोजन करत ही लोककला जोपासत आहेत. त्याचबरोबर प्रति आयोजनात कला, क्रीडा, शैक्षणिक अश्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा -युवतींना युवा पुरस्काराने सन्मानित करत प्रोत्साहन देत आहेत हे कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन केले. त्याचबरोबर लेखक/दिग्दर्शक सतीश जोशी यांच्या नमन सादरीकरणात भव्यता व वेगळेपणा पाहायला मिळाले. कार्यक्रम अप्रतिम झाल्याचे सांगत पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्याचबरोबर कु.ध्रुव हुमणे याचे कौतुक करून स्नेहरूपी आर्थिक भेट देऊन पुढील उज्जवल भविष्य वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात लेखक/दिग्दर्शक सतीश जोशी, स्त्री पात्र साकारणारे युवराज जोशी, यांचाही सदर सोहळ्या प्रसंगी सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष तसेच उद्योजक प्रमोद गांधी, नमन लोककला संस्थेचे अध्यक्ष- रवींद्र मटकर, कलाशिक्षक तसेच सुप्रसिद्ध चित्रकार -अर्जुन माचिवले, नमन लोककला संस्था महासचीव शाहिद खेरटकर, कुणबी बँक संचालक संतोष चौगुले, नमन लोककला संस्था सचिव सुधाकर मास्कर, लेखक दिग्दर्शक संदिप कानसे, आदी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविका/सूत्रसंचालन- दिपक कारकर, शाहिद खेरटकर यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर, रसिकांचे उपरोक्त संस्थेचे अध्यक्ष संतोष घाणेकर यांनी आभार मानले आहे.

# नवी मुंबईत समाजमाध्यमाद्वारे ४२ लाखांची फसवणूक

**दि.११, नवी मुंबई :** समाजमाध्यमाद्वारे पैसे कमवण्याचे आमिष दाखवून एका महिलेची सुमारे ४२ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. संबंधित महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर वाशी पोलीस ठाण्यात फसवणूक करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ऑनलाइन टास्क पूर्ण करा, भरपूर पैसे कमवा असे आमिष दाखवून एका महिलेची ४१ लाख ९२ हजार ५८२ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. फिर्यादी महिला वाशीत राहत असून रोखपाल म्हणून काम करतात. २ जूनला त्यांना रँक माय ॲप कंपनीकडून प्रतीक्षा नावाच्या महिलेचा फोन आला. त्यांनी टेलिग्राम या समाज माध्यमातील टास्क पूर्ण केल्यास एका फेरीसाठी ८०० ते १००० रुपये मिळतील असे आमिष दाखवले. सहज बसल्या बसल्या हे काम होते. म्हणून फिर्यादी महिलेने काम करण्याची तयारी दाखवली. मात्र आगाऊ रक्कम, देयक देण्यापूर्वी विविध कर, हे काम करण्यासाठी नोंदणी शुल्क आदी कारणे पुढे करीत फिर्यादी यांच्याकडून २ जून ते ३ नोव्हेंबरदरम्यान ४२ लाख ८१ हजार ३४६ रुपये विविध खात्यांत मागवून घेतले. अनेकदा मागणी केल्यावर त्यापैकी ८८ हजार ७६४ रुपये परत करण्यात आले. मात्र उर्वरित रक्कम देण्यास टाळाटाळ करीत राहिले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादी महिलेने या व्यवहारात त्यांच्याशी संपर्क साधणाऱ्या चार जणांच्या विरोधात वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वरच्या स्ट्रॉबेरीचा टपाल विभागाकडून गौरव




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१२, महाबळेश्वर :** महाबळेश्वरची ओळख असलेल्या स्ट्रॉबेरीची लोकप्रियता लक्षात घेऊन टपाल विभागाने विशेष सचित्र टपाल शिक्क्याचे (कॅन्सलेशन) उद्घाटन करण्यात आले. स्ट्रॉबेरी उत्पादनाने महाबळेश्वरच्या स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना दिली आहे. विशेष शिक्क्याच्या निमित्ताने महाबळेश्वर स्ट्रॉबेरी टपालाच्या माध्यमातून घराघरात जाणार आहे.महाबळेश्वर स्ट्रॉबेरीवर आधारित विशेष चित्रात्मक टपाल कॅन्सलेशनचे प्रकाशन मुंबई टपाल विभागाच्या सचिव वंदिता कौल यांच्या हस्ते करण्यात आले.मुंबईतील टपाल विभागाच्या मुख्य कार्यालयात (जीपीओ) येथे करण्यात आले. कार्यक्रमाला महाराष्ट्र आणि गोवा टपाल विभागाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंग, पुणे विभागाच्या सुचिता जोशी आणि महाराष्ट्र विभागाचे संचालक अभिजित बनसोडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. पुणे पोस्टल विभागाचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जयभाये हे महाबळेश्वर येथून ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते.हा शिक्का विविध टपाल तिकिटे, कागदपत्रे आणि पोस्टल सामग्रीवर बघायला मिळणार आहे, असे जायभाये यांनी सांगितले.

## मालेवाडा येथे सेवानिवृत्त शिक्षिकेचा सत्कार



**अक्षराज : नंददत्त डेकाटे**

**दि.११, मालेवाडा/ भिवापूर :** गोटाळी मालेवाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका सुनिता गावंडे ( ठाकरे) यांचा गोटाळी येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात सेवानिवृत्ती सत्कार समारोह सोहळा पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी पंजाबराव अंभोरे माजी जिल्हा परिषद सदस्य तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मालेवाडा येथील सरपंच राखी इंगोले, उपसरपंच फुलचंद मेश्राम, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष माधुरी करकाडे या मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

यावेळी केंद्र पहामी वतीने शिक्षिका सुनिता गावंडे (ठाकरे) तसेच त्यांचे पती रामाजी गावंडे यांचा सत्कार करण्यात आला. ज्ञानेश्वरभाऊ जगताप यांनी सेवानिवृत्त होणाऱ्या सुनिता गावंडे या सत्कारमूर्तीचे जीवन परिचयावर प्रकाश टाकला. त्यांचे कार्य विद्यार्थ्यांना व गावातील नागरिकांना समजावून सांगितले. सेवानिवृत्त होणे म्हणजेच प्रत्येकाच्या नशिबी नसते. जे शासनाचे अधिकारी म्हणून कार्यरत असतात त्यांना कधीतरी त्या कार्यापासून दूर होऊन प्रत्येकाचे काम करणे गरजेचे असते. तोच क्षण शिक्षिका सुनिता गावंडे (ठाकरे) यांच्या नशिबी आला. शिक्षिका गावंडे यांनी अहोरात्र शिक्षणाची ओढ विद्यार्थ्यांमध्ये असली पाहिजे म्हणून शिक्षण क्षेत्रात कार्यरत होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामचंद्र लव्हे मुख्याध्यापक शाळा गोटाळी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण गिरडे मुख्याध्यापक उखळी यांनी तर आभार गिरडे यांनी मानले.

यावेळी पहामी केंद्र प्रमुख प्रशांत टेंभुर्णे, विजय मेश्राम, वासुदेव खोंडे, शिक्षिका शिला रोडे, वर्षा चापले, वर्षा कश्यप, शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रामू कडू, तसेच गावातील नागरिक विनोद बावणगडे यावेळी सर्व शिक्षकवृंद व गावातील नागरिक मोठ्या उपस्थित होते.

## जागतिक मानवाधिकार दिन साजरा




**अक्षराज : प्रमोद चिनके**

**दि.११, सांगली :** ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशन महाराष्ट्र वतीने जागतिक मानवाधिकार दिन महाराष्ट्र कार्यालयात साजरा करण्यात आला. मानव अधिकाराचे महत्त्व जाणीव व जागृती या विषयावर मान्यवरांनी आपले मत व्यक्त केले. सामाजिक कार्य करणारे समाजसेवकांचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मौला आली वंटमुरे, सचिव आ. भा. काँग्रेस पक्ष सांगली जिल्हा प्रमुख पाहुणे माननीय सुनील चौगुले अध्यक्ष ख्रिश्चन सेवा संघ, प्रमुख उपस्थिती माननीय हनीफ डफेदार राष्ट्रीय सरचिटणीस ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशन, शबाना नदाफ राज्य समन्वयक ह्यूमन राईट जस्टीस असोसिएशन, नासिर सय्यद अध्यक्ष महाराष्ट्र राज्य ह्युमन राईट जस्टीस असोसिएशन नीता पाटील, सामाजिक कार्यकर्ते व महिला संघटक. युसुफ शेख जिल्हा सचिव रमेश भोसले जिल्हा कार्यकारणी सदस्य उपस्थित होते. त्याच बरोबर जिल्ह्यातून स्त्री पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्ते- नासिर पट्टेवाले, प्रमोद चिनके आदी कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## झोपेत बोटीवरून पडून खलाशाचा मृत्यू !

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.११, दापोली (रत्नागिरी) :** दापोली तालुक्यातील पाजपंढरी येथे झोपेत बोटीवरून समुद्रात पडून तरुण खलाशाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी ९:३० वाजता उघडकीस आली. संजय शांताराम पोस्टुरे (३७, पंदेरी, बहीरवलीवाडी, मंडणगड) असे त्या मृत खलाशाचे नाव आहे. शेजारी झोपलेल्या खलाशाला पोस्टूरे दिसून न आल्याने त्याचा शोध घेतला असता मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती सुरेश चौगुले (५६, पाजपंढरी, पटेकरआळी, दापोली) यांनी दापोली पोलीस स्थानकात दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी चौगुले यांची सिद्धिविनायक मासेमारी बोट आहे. त्यांच्या बोटीवर संजय पोस्टुरे हा खलाशी म्हणून कामाला होता. त्याला दारूचे व्यसन होते. बोटीवरील तांडेल व इतर खलाशी मासेमारी झाल्यानंतर हर्णे बंदर येथे बोटीवरच राहत असत. ५ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजता चौगुले यांची बोट मासेमारी करण्याकरिता समुद्रात गेली होती. ८ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान ही बोट हर्णे बंदरात परत आली. ९ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान बोटीवरील खलाशी निवास हुमणे हा उठला तेव्हा त्याला बोटीवर त्याच्या शेजारी झोपलेला खलाशी संजय पोस्टुरे आढळून आला नाही. त्याने बोटीवर तसेच आसपासच्या समुद्र पाण्यात शोध घेतला.

## माढा मतदारसंघाचे आ.अभिजीत पाटील यांनी रायगडावर घेतले छ. शिवाजी महाराजांचे दर्शन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** मुंबई येथील तीन दिवसीय विधिमंडळाच्या अधिवेशनानंतर माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी स्वराज्याची राजधानी गाठली आणि छत्रपतींच्या गादीसमोर नतमस्तक झाले.निवडून आल्यानंतर रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार अभिजीत पाटील हे आहेत.

रायगडाच्या पावन स्थळावर छत्रपतींचा राज्याभिषेक झाला होता. याच ठिकाणी स्वराज्याचा संकल्प पूर्ण केला होता. या ठिकाणी छत्रपतींचे अनेक वर्ष वास्तव होते. या पवित्र ठिकाणी जाऊन आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी अभिजीत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की छत्रपतींनी हजारो मावळे घडवले आणि स्वराज्याची संकल्पना रुजवली. त्यांच्या प्रेरणेने पुढील पिढ्या घडल्या मराठा साम्राज्याने बलाढ्य शक्तींना परास्त करत अटकेपार झेंडा रोवला. संपूर्ण महाराष्ट्र स्वराज्याच्या आदर्श संकल्पनांवर उभा राहिला आहे.

मला देखील माढा विधानसभेची मिळालेली जबाबदारी एक मावळा म्हणून पूर्ण करायची आहे.



असा संकल्प करून आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या चरणी अर्पण करून आर्यशीर्वाद घेतल्याच्या भावना व्यक्त केल्या.

ते पुढे बोलताना म्हणाले की माढा मतदारसंघात या परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार आहे. माढा मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकही अश्वारूढ पुतळा नाही ही खंत कोणाच्याही मनात राहू देणार नाही असा विश्वास दिला. आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर छत्रपतींचे दर्शन घेतल्यानंतर स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाचा इतिहास जाणून घेत असताना. महाराजांचे वंशज संभाजीराजे छत्रपती हे देखील योगायोगाने रायगडावर आले होते. यावेळी अभिजीत पाटील यांनी त्यांची आवर्जून भेट घेतली तसेच रायगडावर सुरू असलेल्या संवर्धन कार्याबाबत चर्चा केली. कोणतीही पूर्व सूचना न देता अचानक झालेली भेट आनंददायी ठरली असल्याच्या भावना आमदार पाटील यांनी व्यक्त केल्या.

याप्रसंगी त्यांचे रायगड दर्शन सुरू असताना एका ठिकाणी शाळेतील विद्यार्थी इतिहास जाणून घेत असताना त्यांना दिसले. त्यामधील एका शिक्षकांनी आमदार अभिजीत पाटील यांना ओळखले आणि संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि योगायोगाने भेट झालेले स्वराज्याचे वंशज यांच्याशी संवाद साधता आल्याचा आनंद व्यक्त केला. यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर इतिहास जाणून घेण्यासाठी काढलेल्या अशा संस्कारित सहलीसाठी शिक्षकांचे अभिनंदन करत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे छत्रपती आणि भविष्यातील अनेक बालक छत्रपती यांची एकत्रित भेट म्हणजे इतिहास वर्तमान आणि भविष्य याचे एकत्रित दर्शन घेऊन नवी ऊर्जा घेऊन परतलो असल्याच्या भावना यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केल्या.

## ठाणे जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या घटली...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, ठाणे :** कुपोषणाचा टक्का कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने समुपदेशन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष आहार अशी त्रिसूत्री कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विशेष प्रयत्न सुरू असून ग्रामीण भागातील कुपोषित बालकांची संख्या सप्टेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ८८ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ०२३ होती तर नोव्हेंबर २०२४ रोजी अखेर (तीव्र कुपोषित) सॅम २२ तर मध्यम कुपोषित (मॅम) ६२ कुपोषित बालकांची संख्या कमी करण्यात यश आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने समुपदेशन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष आहार अशी त्रिसूत्री कार्यक्रम १ हजार ६४७ अंगणवाडीतील ८३ हजार ४२७ बालकांसाठी राबवण्यात येत आहे. तसेच दत्तक पालक योजना, पालकसभा घेऊन मुलांचा दिनक्रम, आहाराच्या वेळा, चविष्ट आणि तितकेच सकस अन्न बालकांना देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. कुपोषित बालकांची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने आयआयटी मुंबई सारख्या



**जिल्ह्यातील मागील तीन महिन्यातील कुपोषित बालकांची संख्या**

सप्टेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ८८ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ०२३, ऑक्टोबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ७६ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ००९, नोव्हेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ६६ तर मध्यम कुपोषित (मॅम) ९६१ आहेत.

नामांकित संस्थाचा देखील सहभाग घेण्यात आला असून बालकांची काळजी घेण्यासाठी व्हिडीओ मार्फत तसेच पालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येत असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी दिली आहे.

गरोदरपणात मातेला योग्य सकस आहार न मिळाल्यास मूल कुपोषित जन्माला येण्याची शक्यता असते. तर मूल जन्मल्यानंतर त्याला मातेचे पुरेसे दूध व पोषण आहार न मिळाल्यास बालके कुपोषणाच्या विळख्यात अडकू शकतात. त्यामुळे गरोदरपणात व प्रसूती नंतर मातांना व सहा महिन्यांनंतर बालकांना नियमितपणे अंगणवाडी सेविकांमार्फत पोषण किट वाटप करण्यात येत आहे.

जिल्हा प्रशासनाकडून गरोदर व स्तनदा मातांना बाळंतवीडा, कुपोषित मुलांना पोषकवडी, स्तनदा मातांना पाळणा इ. नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. त्याचबरोबर विविध स्वंयसेवी संस्था (उदा.स्नेहा फाऊंडेशन, अन्नदा फाऊंडेशन इ.) च्या मदतीने डोळखांब/ शहापूर प्रकल्पातील कुपोषित बालकासाठी कामकाज करण्यात येत आहे. परिणामी प्रतीवर्ष कुपोषीत बालकांमध्ये सुधारणा टक्केवारीत वाढ होत आहे.


## जाणिव संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्याचे निवेदन

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.११, धाराशिव :** वाशी तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना तसेच वाशी तालुक्यातील गायरान अतिक्रमित धारक शेतकऱ्यांच्या नावे गायरान पट्टे करावे व इत्यादी मागण्यासाठी जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांना निवेदन देण्यात आले आहे.

तसेच यासह इतरही मागण्या करण्यात आल्या वाशी तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावण बाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ काळ योजना, यांच्या पेन्शन वाटपामध्ये २०२२ पासून तफावत असून सातत्याने सर्वांनी श्रावणबाळ सेवा योजनेचे अर्ज भरून कोणाला१३००, १५००, १००० रुपये पेन्शन देऊन पिळवणूक केली जाते आहे.

केंद्र सरकारचा वाटा आला नाही असे म्हटले जाते. आला तरी अनेक लाभधारकांना दिला जात नाही, याची सखोल चौकशी होऊन सर्वांना समान पेन्शन वाटप करण्यात यावी. वाशी तालुक्यातील १९८५ पासून अठरा गावातून भूमिहीन दलित आदिवासी यांनी शासकीय पड गायरान जमिनीवर अतिक्रमण करून पिके काढून आपला उदरनिर्वाह भागवत आहेत. सातत्याने निवेदने, धरणे, आंदोलने करून देखील



कसलीही कारवाई होत नाही. यासाठी मा. जिल्हाधिकारी धाराशिव, मा. मुख्यमंत्री मंत्रालय मुंबई, व तहसील कार्यालय वाशी यांच्याकडे पुरावे दाखल केलेले आहेत. तरी वस्तूस्थितीची पाहणी करून अतिक्रमित गायरान धारकांच्या नावे सातबारा देण्यात यावा.

एकल महिला, विधवा, परीतक्त्या, आर्थिक दुर्बल, गोरगरीब यांना २१ हजार वार्षिक उत्पन्नाचे ऐवजी ५१ हजार रुपयाची आट लागू करा. व सर्वांना संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, एकल महिला विधवा, परीतक्त्या यांना पेन्शन लागू करावी. वाशी तालुक्यातील मागासवर्गीय, आदिवासी यांना गावोगावी स्मशानभूमी देण्यात यावी, व असलेली स्मशानभूमी नावावर करून ताबा देण्यात यावा, विभक्त कुटुंबांना शिधापत्रिकेची फोड करून नवीन शिधापत्रिका वाटप करण्यात यावी, व सर्वांना रेशनचा लाभ देण्यात यावा. अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत या निवेदनावर श्रावण क्षीरसागर, रामभाऊ लगाडे यांच्या स्वाक्षऱ्यात आहेत.

## संतप्त नागरिक, पालक डी-मार्टसमोर आज करणार गुरुवारी रास्तारोको आंदोलन

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि. ११, धाराशिव :** सर्व्हिस रोड व अंडरपासच्या मागणीसाठी वारंवार निवेदने देऊन, आंदोलन करुनही टाळाटाळ केल्यामुळे पोदार शाळेतील विद्यार्थ्याला अपघातात जीव गमवावा लागला. त्यामुळे संतप्त पालक व नागरिकांनी गुरुवारी (दि.१२) डी-मार्टसमोर रास्तारोको आंदोलन करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकार्यांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, धाराशिव शहरातील डी- मार्ट समोर व डी मार्ट ते आयुर्वेदिक कॉलेज या सर्व ठिकाणी नॅशनल हायवेच्या दोन्ही बाजूस सर्विस रोडचे काम सुरु आहे. सदर कामाच्या अनुषंगाने सर्विस रोड तयार करण्यापूर्वी सिमेंट-कॉंक्रीटच्या नाल्या बनविण्याचे कामकाज सुरु आहे. सदर काम करत असतान सर्विस रोडसाठी नियमानुसार



जागा सोडने आवश्यक आहे. परंतु विविध ठिकाणी सर्विस रोडची रुंदी कमी झाल्याचे दिसून येते.

त्याचप्रमाणे पोद्दार शाळेजवळ विकास नगर येथे व जुना उपळा रोड येथे नॅशनल हायवेच्या दोन्ही बाजूने लहान चार चाकी वाहने जातील असे असे दोन अंडरपास करणे गरजेचे असताना त्याकडे विविध तांत्रिक कारणे देऊन विलंब व टाळाटाळ केली जात आहे. सदर दोन्ही अंडरपास चे काम लवकर केल्यास शहरातील नॅशनल हायवेच्या दोन्ही बाजूने पोदार शाळेमध्ये ये-जा करणार्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना तसेच डी मार्टकडे व जुना उपळा रोडकडे सुरक्षीतपणे ये-जा करणे सोयीचे होईल व जीवितहानी होणार नाही. सदर क्षेत्रामध्ये डी मार्ट समोरील पुलावरून भरधाव वेगाने येणारे वाहन जोपर्यंत जुना उपळा रोड क्रॉस करून जाणार नाही तोपर्यंत अशाच प्रकारचे अपघात होत राहतील.

कारण तेथेच विविध कारणांसाठी मोठ्या प्रमाणात नागरीक दोन्ही बाजूकडे ये-जा करत असतात. त्यानुसार सदर कामकाज नियमानुसार विहित वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु त्यामध्ये जाणीवपूर्वक विलंब व टाळाटाळ केली जात आहे. या बाबत वरील संदर्भीय पत्रानुसार वेळोवेळी जिल्हा प्रशासनास व नॅशनल हायवे प्राधिकरणास निवेदने देऊन सुद्धा अद्याप पर्यंत डी मार्ट समोरील सर्विस रोडचे तसेच पोदार शाळेजवळील व जुना उपळा रोड येथील दोन्ही अंडरपासचे काम पूर्ण झालेले नाही.

तसेच डी-मार्ट समोर नॅशनल हायवेच्या विरुध्द बाजूस होत असलेल्या सर्विसरोडच्या जागेमध्ये जाणीव पुर्वक लोखंडी ब्रीज (पूल) चे कॉलम उभा करुन व त्याच्या अलीकडून सर्विस रोडच्या जागेमध्ये नालीचे काम सुरु केल्याने सर्विसरोडची रुंदी कमी झाली आहे. व अशाच प्रकारे शहरातील इतर ठिकाणी सुद्धा सर्व्हिस रोड ची रुंदी कमी झाल्याचे दिसून येते. याबत आपले कार्यालयास निवेदन देऊन सुद्धा सदरचे नियमबाह्य काम सुरूच आहे. यामुळे सदर क्षेत्रामध्ये अपघाताच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ झाली आहे. त्यातच दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी पोदार शाळेतील एका विद्यार्थ्याचा शाळेतून घरी जाताना अपघाती मृत्यू झालेला आहे. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची व चिंतेची आहे.

# परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ पालम शहर कडकडीत बंद





**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.११, पालम (परभणी) :** परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळील प्रतिकात्मक भारतीय संविधानाची प्रतिमा तोडून संविधानाची विटंबना व अवमान करणाऱ्या देशद्रोही आरोपींना कठोरात कठोर शासन करण्यात यावे.

या मागणीसाठी व सदरील घटनेचा तीव्र निषेध करण्यासाठी पालम येथील आंबेडकर अनुयायीनी बुधवार, दि.११ डिसेंबर रोजी पालम शहर बंद चे अहवान केले होते. या अहवानास शहरातील व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत पालम शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. या दरम्यान सदरील घटनेचा निषेध करण्यासाठी शहरासह तालुक्यातील आंबेडकर अनुयायी एकत्र जमून बौध्द विहार पासून तहसील कार्यालया पर्यंत मोर्चा काढून संविधान बचाव संदर्भात घोषणा देत व आरोपीस कठोर शासन करावं या साठी आक्रोश दाखवत तहसीलदार यांना निवेदन दिले.

सदरील निवेदनात परभणी शहरातील मध्यवर्ती भागात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असणाऱ्या महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जवळील प्रतिकात्मक संविधान प्रतिमेची भर दिवसा तोडफोड, विटंबना करणे हे भारतीय नागरिकांसाठी अत्यंत दुःखद व अतिशय निंदनीय असून सदर घटनेतील आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मात्र मद्यपानाच्या नावाखाली आरोपींना सहज व हलक्यात न घेता सदर राष्ट्रद्रोही कृत्य करण्यामागे आरोपीचा उद्देश काय आहे. याचा सर्वोच्च तपास होणे अत्यंत गरजेचे आहे. अशी मागणी करत या सदर देशद्रोही घटनेच्या निषेधार्थ पालम शहर बंद ठेवण्यात येत असून तसेच यापुढे अशा राष्ट्रद्रोही घटनांना राज्यात व देशात आळा घालण्यासाठी आरोपीला कठोरात कठोर शासन करण्यात यावे अशी मागणी निवेदणाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी पालम शहरासह तालुक्यातील विविध संघटनेचे पदाधिकारी आंबेडकर अनुयायी, बहुजन समाज बांधव व महिलांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती. या दरम्यान पोलीस निरीक्षक सुरेश थोरात यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# बांगलादेश विरोधात लासलगाव येथे मूक मोर्चा...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** बांगला देशामधील अल्पसंख्याक हिंदू कुटुंबे, हिंदू महिला यांच्यावर इस्लामिक कट्टरवाद्यांनी अत्याचार सुरू केले आहेत. हिंदू मंदिरांची तोडफोड व मूर्तींची विटंबना केली जात आहे. तेथील हिंदू बांधवांवर होणारे अमानवी अत्याचार ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

याच पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाजाच्यावतीने मंगळवार, १० डिसेंबर रोजी लासलगांव येथे मूक मोर्चा निघाला होता. या मूक मोर्चाची सुरवात लासलगांव येथील प्रभु श्री राम मंदिरापासुन सुरवात होऊन लासलगांव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उप निरीक्षक भास्करराव शिंदे यांना निवेदन देऊन सांगता झाली. हिंदू समाजाच्या वेदना सरकारला कळाव्यात. यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने हा मूक मोर्चा काढण्यात आला होता. या निषेध मोर्चामध्ये सर्व




समाजाच्या नागरिकांनी सहभाग नोंदवला होता.

मुक मोर्चाच्या दरम्यान कोणताही अनुचीत प्रसंग घडु नये यासाठी मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. लासलगांव येथील सर्व व्यापारी वर्गाने स्वयंस्फुर्तीने सकाळपासुन आपले व्यवसाय बंद ठेवले होते. रस्त्यावर सर्वत्र शुकशुकाट जाणवत होता. मुक मोर्चा संपल्यानंतर लासलगांव येथील सर्व व्यवसाय, दुकाने पुर्ववत सुरु झाले होते. मोर्चा दरम्यान कोणताही अनुचीत प्रसंग घडु नये यासाठी स.पो. उप.नि. भास्करराव शिंदे यांनी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला होता. बांगला देशामध्ये हिंदू समाजावर कट्टरपंथीयांद्वारे अत्याचार होत आहेत. त्यांची मंदिरे, घरे, दुकाने जाळली जात आहेत. तेथील हिंदू महिलांवर अमानवीय अत्याचार होत आहेत. मुंडा, चकमा, कुकी, बौद्ध आदी आदिवासी व दलित हिंदू बांधवांना ईस्लामी कट्टरतावाद्यांनी जीवन जगणे मुश्किल केले आहे.

हे सर्व घडत असतांना बांगला देशाचे सरकारने हस्तक्षेप करणे गरजेचे होते, परंतु त्यांच्या कृतीतुन अत्याचारास मूकसंमती देत असल्याचे दिसून येते. मूक मोर्चामध्ये हिंदू सारा एक है, सारे विश्व का हिन्दू एक है, बटेंगे तो कटेंगे, हिंदुओ पर अत्याचार हमे रक्षा का अधिकार, एक है तो सेफ है, अशा घोषणा लिहीलेले फलक हाती घेवुन मूक मोर्चा संपन्न झाला.

# सकल हिंदू समाजाच्यावतीने जिल्हाभर मोर्चे खा.लंके यांच्याकडून बांगलादेशमधील अत्याचाराचा निषेध

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** बांगलादेशमधील हिंदू समाजावर होत असलेल्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात तसेच बांगलादेशचा निषेध करण्यासाठी मंगळवार, दिनांक १० डिसेंबर नगर शहरासह जिल्हाभरात विविध तालुक्यात सकल हिंदू समाजाच्या वतीने निषेध मोर्चे काढण्यात आले. सर्वपक्षीय कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते. सर्व ठिकाणचे मोर्चे शांततेत पार पडले.



खासदार निलेश लंके यांच्याकडून निषेध खासदार निलेश लंके यांनीही बांगलादेशमध्ये हिंदूवरील अत्याचाराचा निषेध करणारे निवेदन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना दिले. बांगलादेशमध्ये जाणीवपूर्वक हिंदू मंदिरे व हिंदूंना लक्ष केले जात आहे. आध्यात्मिक गुरू चिन्मय कृष्णदास यांना अटक करण्यात आली. बांगलादेशमध्ये मानवतेच्या मर्यादा ओलांडल्या जात आहेत. बांगलादेशमध्ये मानवता धर्म जोपासण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावीत व हिंदू धर्मीयांना दिलासा द्यावा. अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

नगर शहरात मोटरसायकल मोर्चा काढून तहसीलदार संजय शिंदे यांना निवेदन देण्यात आले. मोर्चाची सुरवात राजाभाऊ मुळे, सचिन जगताप, संभाजी कदम आदींच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. माळीवाडा-पंचवीस चावडी-कापड बाजार-सर्जेपुरा-प्रोफेसर कॉलनी यामार्गे तहसील कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. बांगलादेशमधील हिंदूंवर अत्याचार होत आहेत, तेथील लष्कर ही अत्याचार करणाऱ्यांना सहकार्य करत आहे.

भारत सरकारने बांगलादेशमधील हिंदू समाजाला मदत करावी. हिंदू संत चिन्मयदास यांची सुटका करावी. बांगलादेशमध्ये होत असलेल्या अत्याचाराबद्दल भारतातील हिंदू समाजात रोष निर्माण झालेला आहे. याकडे निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे. मोर्चेकऱ्यांकडून बांगलादेश निषेधाच्या जय श्रीराम च्या घोषणा देण्यात आल्या. श्रीरामपूरमध्ये स्वयंवर मंगल कार्यालयापासून निघालेल्या मोर्चा तहसील कार्यालयावर नेण्यात आला. तहसीलदार मिलिंद वाघ यांना निवेदन देण्यात आले.

जिल्हा संघचालक किशोर निर्मळ, तालुका कार्यवाह प्रमोद शेवाळे, डॉ. शिरसाट, राजेंद्र सोमाणी यांची भाषणे झाली. राहुरीमध्ये खरेदी- विक्री संघाच्या कार्यालयापासून मोर्चाची सुरुवात झाली. कोणत्याही घोषणा न देता भगवे झेंडे भगव्या टोप्या, गळ्यात भगवे उपरणे घालून तहसील कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला.

महिलाही मोठ्या संख्येने सहभागी होत्या. मोर्च्याचे संयोजक प्रसाद बनकर, ह.भ.प अर्जुन दुशिंग, आमदार शिवाजीराव कर्डिले, युवा नेते अक्षय कर्डीले यांनी तहसीलदार नामदेव पाटील व पोलीस निरीक्षक संजय ठेगे यांना निवेदन दिले.

# नववर्षात सलून आणि ब्युटी पार्लर सेवा महागणार...?

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.११, मुंबई :** सलून ब्युटी पार्लर व्यवसाय म्हणजे अत्यावश्यक सेवा देणारे व्यवसाय बनला आहे.अत्याधुनिकतेच्या प्रवाहात या व्यवसायाने देखील आपल्या ग्राहकांच्या आवडी निवडी जोपासुन काळानुरूप वेळोवेळी बदल केला आहे.आधुनिकतेची कास धरताना आपल्या ग्राहकांच्या विविध मागणीनुसार त्यांनी नेहमीच आपल्या कलेत आणि सेवेत अमुलाग्र बदल करून ग्राहकांचे हित आणि समाधान जोपासण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला आहे.

कोरोणा सारख्या महामारीने अक्षरशः कंबरडे मोडलेल्या या व्यवसायाने कोणतीही मदत नसताना आपल्या ग्राहकांची परिस्थिती ओळखून कसलीही भरीव दरवाढ न करता आपली सेवा अविरत सुरू ठेवली होती. परतु सध्याच्या वाढत्या महागाईमुळे आणि विविध बँकांच्या कर्जाच्या हफ्त्यांमुळे समस्त सलून व्यवसायिक आज अधिकच अडचणीत आला आहे. सरकारचे वाढलेले विविध कर,परवाना शुल्क, सलून ब्युटी पार्लर वस्तू आणि सौंदर्य प्रसाधनांचा वाढता दर यामुळे या व्यावसायिकांना आपला व्यवसाय चालविणे आता कठीण होऊन बसले आहे.

या समस्येवर मात करून व्यवसायावर ओढवलेल्या या कठीण समस्येतून व्यवसायाला आणि साहजिकच व्यवसायिकांना बाहेर काढण्यासाठी नववर्षाच्या सुरुवातीला म्हणजेच येत्या १ जानेवारी पासून सरासरी २० ते ३० टक्के दरवाढ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय सलून व्यवसायिकांनी घेतला आहे. दरम्यान ही दरवाढ मुंबई सह संपूर्ण राज्यभर होणार असल्याचे सलून ब्युटी पार्लर असोसियेशन महाराष्ट्र राज्य यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

# पत्नीच्या संशयावरून जावयाने केला सासूचा खून

## नरसी येथील थरारक घटना; आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.११, नांदेड :** पत्नीच्या संशयावरून जावयाने धारदार चाकूने गळा कापून सासूचा केला खुन -हदयद्रावक घटना बुधवार, दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान नरसी (ता. नायगांव) येथील बजरंगनगर येथे घडली. आरोपी ताब्यात हे वृत्त लिही पर्यंत रामतीर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती. सदरील घटनेबद्दल पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की नरसी येथील बजरंगनगर येथे राहणारी पारूबाई लक्ष्मण रॅपनवाड वय ६२ हिचा जावई अशोक किशन धोत्रे वय ४० राहणार उल्हासनगर नांदेड हा आज बुधवारी सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान नरसी येथे सासूरवाडीत घरी येऊन तू माझ्या बायकोला उज्वला हिस माझ्याकडे का पाठवत नाहीस ? म्हणून पारूबाई हिच्या गळ्यावर व अंगावर धारदार चाकूने सपासप वार केले यात पारूबाई रॅपनवाड हिचा जागीच मृत्यू झाला. आपल्या आईचा नवऱ्याने खून केला असल्याचे बघून उज्वला अशोक धोत्रे ही थेट नरसी पोलीस चौकी गाठली आणि घडलेली हकीकत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांना सांगताच घटनास्थळी पोलीस दाखल झाले. घटनास्थळी पंचनामा करून पारूबाईचा मृतदेह नायगावच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवला असल्याची माहिती दिली. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली प्रशांत संपते व अप्पर पोलीस अधीक्षक नांदेड सुरज गुरव यांनी नरसी येथे घटनास्थळी भेट देऊन माहिती जाणून घेतली असून सदरील वृत्त लिहीपर्यंत रामतिर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

# थोडक्यात

## जिल्हास्तरीय दिव्यांग मुलामुलींच्या क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धेचे धाराशिव येथे आयोजन



**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.११, धाराशिव :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. इडीडी/२०१०/प्रक्र १२१/ सुधार २, दिनांक १३/१०/२०१० च्या शासन निर्णयान्वये शासकीय/ अनुदानित विना अनुदानित व कायम स्वरुपी विना दिव्यांगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळामधील दिव्यांग मुला-मुलींच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना खेळामध्ये संधी मिळावी. त्यांच्यातील सुप्त क्रीडा विषयक कौशल्यांना संधी मिळावी व त्या दिव्यांग व्यक्तींमधील न्युनगंड दूर होऊन त्यांचा जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा दृष्टीकोन विकसीत व्हावा. तसेच दिव्यांग व्यक्तीसुध्दा समाजाचा एक उपयुक्त घटक म्हणून पुढे यावा. यासाठी दरवर्षी ३ डिसेंबर या आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनाचे औचित्य साधुन जिल्हास्तरीय दिव्यांग मुलामुलींच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजन समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव यांचे विद्यमाने करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेतून प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना राज्यस्तरीय अपंग मुला- मुलींच्या क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते.

सन २०२४-२५ या आर्थीक वर्षामध्ये जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन दिनांक १७ डिसेंबर व १८ डिसेंबर २०२४ रोजी या कालावधीमध्ये श्री तुळजाभवानी स्टेडिअम, धाराशिव येथे करण्यात आले आहे. सदर स्पर्धेमध्ये प्रवर्गनिहाय मुकबधिर ३७५, अस्थिव्यंग २५०, मतिमंद ४००, अंध २५ असे एकूण १०२५ स्पर्धक सहभागी झाले आहेत. या स्पर्धा २ दिवसाच्या कालावधीमध्ये प्रवर्गनिहाय व वयोगट निहाय मुला-मुलींसाठी स्वतंत्र क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये २५ मीटर भरभर चालणे, ५० मी धावणे, १०० मी धावणे, १०० मी धावणे, ४०० मी धावणे, व्हील चेअर रेस, व्हील चेअरवर बसुन सॉफटबॉल थ्रो, व्हील चेअरवर बसुन गोळा फेक, लांब उडी, स्पॉट जंप, बादलीत बॉल टाकणे, बुध्दीबळ, गोळाफेक, चित्रकला, रांगोळी इ. क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व क्रीडा स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त पदक मिळविणाऱ्या दिव्यांगांच्या विशेष शाळेस गुणांकन नुसार सर्व साधारण विजेतेपद देवून गौरविण्यात येत आहे. धाराशिव जिल्हयातील सर्व नागरिकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प.धाराशिव सुनिल खमितकर यांनी केले आहे.

## हत्तीरोग दुरीकरणासाठी महापालिका कार्यक्षेत्रात सार्वत्रिक औषधोपचार मोहिम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, पनवेल :** हत्तीरोग बाधित नसलेल्या जिल्ह्यात हत्ती रोग दूरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबवून त्याअंतर्गत रात्र रक्त नमुने संकलन सर्वेक्षणाबाबत मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत. त्यानूसारआयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक ०९ डिसेंबर ते १४ डिसेंबर पर्यंत ही मोहिम राबविण्यात येणार आहे. हत्तीरोग बाधित नसलेल्या जिल्ह्यातील ५ लाख लोकसंख्येप्रमाणे होणाऱ्या या मोहिमेमध्ये ब्लॉक्सनूसार रात्र रक्त नमुने संकलन सर्वेक्षण करण्यात येणार आहे.या अनुंषगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १४ कामोठे नौपाडा, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १० रोहिंजण, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तळोजा फेज २ पाचनंद, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र खांदा कॉलनी टेंभोडे-पडघे या विभागाची निवड करण्यात आली असून येथील रात्र रक्त नमुने संकलन करण्यात येणार आहे.

या शहरी भागांमधून हत्तीपाय आणि अंडवृध्दी रुग्णांची सर्वाधिक संख्या असलेला एक भाग निवडण्यात येणार आहे. तसेच मागील फेऱ्यांमधील, नकाराचे उच्च दर असलेले क्षेत्र, झोपडपट्ट्यांचे प्रभाग, मोठ्या स्थलांतरित लोकसंख्येच्या वसाहती असलेली क्षेत्राची निवड करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी दिली आहे. या मोहिमेंतर्गत निवडलेल्या प्रत्येक भागासाठी २ टीम तयार करण्यात येणार आहेत. प्रत्येक टीम मध्ये २ आरोग्यसेवक असणार आहेत. या टीमच्या माध्यमातून स्थानिक आरोग्य सेविका व आशा यांचे सहकार्य घेऊन रात्री ८ ते १२ यावेळेत रात्र रक्तनमुने घेण्यात येणार आहे. दिनांक ०९ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधित ही मोहिम राबविण्यात येत आहे. दररोज एक टीम ५० रात्र रक्तनमुने घेऊन आणि ते सर्वात नजीकच्या प्रशिक्षित प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांचेकडून तपासून घ्यावे. हत्तीरोग दूषित रुग्णांना स्थानिक वैद्यकीय अधिकारी यांचे देखरेखीखाली समूळ उपचार घ्यावेत. तसेच रात्र रक्तनमुने तापसणीचा अहवाल दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजेपर्यंत या कार्यालयास अहवाल त्वरित सादर करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आले आहे.

## मुर्टी गावातील वाडी वस्तीवरुन शेळ्यांची चोरी

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१०, बारामती :** बारामती तालुक्यातील मुर्टी या गावातील चिरेखानवाडी व भोसले वस्ती वरुन शेळ्या चोरीला गेल्या आहेत. दि.०८ डिसेंबर रविवारी रोजी रात्रीच्या वेळी चिरेखानवाडीतील शेळी पालक श्री भगवान विठ्ठल शेलार यांचे ४९३ गट मध्ये मोठ्या १० ते १२ शेळ्या असून त्यामधील १ ते दीड वर्षाचे बोकड अंदाजे किंमत २०,००० रुपये व दीड वर्षाची शेळी अंदाजे किंमत १५,००० रुपये च्या शेळी आणि बोकडाची चोरी झाली होती.

त्याच प्रमाणे भोसले वस्ती वरील संजय पांडुरंग भोसले यांच्या १ वर्षाच्या दोन शेळ्या अंदाजे किंमत प्रत्येकी १० हजार रुपये किमतीच्या शेळ्या चोरीस गेल्याने मुर्टी येथे भितीचे वातावरण पसरले आहे. शेलार व भोसले यांनी अज्ञात व्यक्ति विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून करंजे पोलिस स्टेशन चे पोलिस तपास करत आहेत .

मुर्टी येथे चोरीचे प्रमाण वाढल्याने वाडी वस्तीवरील तरुणांनी सतर्क राहून पहारा करावा. काही वेगळा प्रकार वाटल्यास पोलिस पाटील व पोलिस प्रशासनाला कळववावे. असे आवाहन मुर्टी गावच्या पोलिस पाटील तृप्ती देविदास गदादे यांनी केले आहे.